महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : तिसरे अंक : २६४ वे दिनांक : २०/०९/२०२६ वार : रविवार

## 'हे सरकार तुमच्या दारावर टकटक करणार' आणि त्याची सुरुवात झाली - राज ठाकरे



**मुंबई** : उच्च-मूल्याच्या UPI व्यवहारांवर 15 ऑक्टोबर 2026 पासून नवीन मर्चंट डिस्काउंट रेट म्हणजेच MDR लागू होणार आहे. सरकारच्या या निर्णयावरून विरोधकांनी टीकेची झोड उठवली आहे. यावर आता महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांनी देखील टीका केली आहे. मी गेली अनेक वर्ष सांगतोय गाफील राहू नका, हे सरकार तुमच्या दारावर टकटक करणार, आणि त्याची सुरुवात झाली असल्याची टीका राज ठाकरे यांनी केली आहे.

मनसे प्रमुख राज ठाकरे याणणू सोशल मीडियावर आपले मत व्यक्त करत सरकारवर टीका केली आहे. ते म्हणाले, केंद्र सरकारने युपीआय व्यवहारांवर 'मर्चंट डिस्काउंट रेट' अर्थात सोप्या भाषेत युपीआय व्यवहारांवर अगदी सरसकट नाही पण शुल्क लावून भारतीयांवर मग ते व्यापारी असोत की ग्राहक यांच्यावर, 'डिजिटल सापळा' लावला आहे. आधी नोटबंदी करून मग आता आम्ही कसं डिजिटल व्यवहाराला चालना देतोय हे दाखवत युपीआय व्यवस्था आणली. मग त्याचा गाजवजा केला, स्वतःची स्तुती करून घेतली, लोकांना सवय लावली आणि अचानक एकेदिवशी घोषित करून टाकलं की आता या व्यवहारांवर शुल्क लागेल. थोडक्यात नागरिकांना गुंगवत ठेवलं आणि हळूच 'डिजिटल सापळ्यात' पकडलं. मी गेली अनेक वर्ष सांगतोय की गाफील राहू नका किंवा सगळं किती आलबेल आहे आणि किती छान सुरु आहे असं अजिबात मानू नका. तुमच्या दारांवर हे सरकार कधीतरी टकटक करणार. आणि त्याची सुरुवात झाली आहे.

राज ठाकरे पुढे म्हणाले की, सरकारने डिजिटल व्यवहारांसाठी युपीआय व्यवस्था आणली. तिला प्रतिसाद मिळेल असं बघितलं आणि तिला प्रतिसाद मिळाला हे सगळं ठीक आहे. पण जर हेतू डिजिटल पेमेंट व्यवस्था आणून आर्थिक देवाणघेवाण सोपी करणं इतका स्वच्छ होता, तर ज्या दिवशी या पेमेंटच्या इन्फ्रास्ट्रक्चरमध्ये गुंतवणूक केली तेंव्हाच ती चालत राहावी आणि सामान्य माणसांच्या खिशाला झटका बसू नये म्हणून तरतूद का नाही केली ? अशा पेमेंट व्यवस्थांसाठी दीर्घकालीन देखभाल असो की सायबर सुरक्षा असो यासाठी पैसा लागणार मग त्याची तरतूद अर्थसंकल्पात कायम स्वरूपी का नाही केली? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला आहे.

तसेच ग्राहकांनी २००० रुपयांपेक्षा जास्तीची खरेदी केली ०.४% एमडीआर लागू होणार ? आणि सरकारचं म्हणणं आहे की हा भार व्यापाऱ्यांनी सोसायचा, काय खात्री आहे की व्यापारी हा भार सोसतील आणि ग्राहकांच्या माथी तो मारणार नाहीत ? यासाठी काही यंत्रणा सरकारकडे आहे का ? उत्तर आहे अजिबात 'नाही'.

पुन्हा सध्याच्या अर्थमंत्री बाईंना श्वासोच्छवासावर शक्य नाही म्हणून अन्यथा त्यावर पण त्यांना १८% जीएसटी लावायचा आहे. त्यामुळे त्यांनी या एमडीआरवर पण जीएसटी लावला आहे. थोडक्यात जमेल तिथून नागरिकांच्या खिशात हात घालत आहेत. पंतप्रधान मोदी परदेशांत जाऊन युपीआयची जाहिरातबाजी करायचे आणि स्वतःची पाठ थोपटवून घ्यायचे, ते आता परत जेंव्हा परदेशांत जातील तेंव्हा मी कसा एमडीआर आणि जीएसटी लावला हे पण हसून हसून सांगणार का? असा खोचक सवाल राज ठाकरे यांनी केला आहे.

काँग्रेस पक्षाने आरोप केला आहे की हे सगळं अमेरिकन सरकारच्या दबावाखाली केलं आहे म्हणून. मला त्याबद्दल माहित नाही. पण हा निर्णय घेताना केंद्र सरकारने कोणाशी सल्लामसलत केली, किंवा परदेशी कार्ड कंपन्या आणि जागतिक पेमेंट व्यवस्था यांची अस्वस्थता नव्हती असं सरकार ठाम सांगू शकेल ? उत्तर नाही असं आहे. सरकारवर कुठून तरी दबाव असेल, त्यांनी त्याचा फायदा स्वतःची तिजोरी भरून काढायला वापरला, असे राज ठाकरे म्हणाले.

प्रश्न चार पैसे किंवा चाळीस रुपयांचा नाही. प्रश्न सरकारच्या हेतूचा आहे. नोटबंदी असेल किंवा डिजिटल पेमेंट व्यवहार असतील यात सरकारचे हेतू कधीच स्वच्छ दिसले नाहीत. UPI चालवण्याचा खर्च कोण करणार, याचा विचार व्यवस्था उभी करतानाच व्हायला हवा होता. जो केला नाही किंवा करायचा नाही असं आधीच ठरलं होतं. २०२२ ला अर्थ खात्याने असं स्वच्छ सांगितलं होतं. पण हे सांगताना मी म्हणलं तसं कधी तुमच्या खिशात हात घालायचा हे पण ठरलं होतं. आणि दोन माणसांच्या व्यवहारांवर शुल्क लावत नाही आहोत असले भंपक युक्तिवाद सरकारने करू नये. तुम्ही डिजिटल सापळा लावला आहे आणि त्यात प्रत्येक भारतीय आता अडकला आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेना या एमडीआरचा निषेध नोंदवते. हे शुल्क भरण्यास व्यापाऱ्यांनी सपशेल विरोध करावा, असे आवाहन राज ठाकरे यांनी केले आहे.

राज ठाकरे यांनी ट्विटमध्ये दोन फोटो देखील जोडले आहेत, ज्यात २१ ऑगस्ट २०२२ ला सरकारने युपीआय व्यवहारांवर कुठलंही शुल्क असणार नाही असं घोषित केलं होतं, त्या ट्विटचा स्क्रिनशॉट मुद्दामून इथे जोडत असल्याचे त्यांनी नमूद केले आहे.

## अरबाज शेखकडून तुकाराम मुंढेंचे कौतुक



**मुंबई** : महाराष्ट्राच्या अन्न व औषध प्रशासनाच्या आयुक्तपदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर अधिकारी तुकाराम मुंढे यांच्या कारवाईची सध्या मोठी चर्चा सुरू आहे. विविध ठिकाणी तपासणी आणि कारवाई करत असल्याने त्यांच्याकडे नागरिकांकडूनही अनेक तक्रारी केल्या जात आहेत. आता 'सैराट' चित्रपटातील सल्या या भूमिकेमुळे प्रसिद्ध झालेला अभिनेता अरबाज शेख याने तुकाराम मुंढे यांचे कौतुक करत एक व्हिडिओ सोशल मीडियावर शेअर केला आहे.

अरबाज शेखच्या वडिलांवर काही दिवसांपूर्वी उपचार सुरू होते. त्यावेळी हॉस्पिटलशी संबंधित काही बाबींवर त्याने सोशल मीडियाच्या माध्यमातून आवाज उठवला होता. त्याने हॉस्पिटल प्रशासनाकडून होणाऱ्या कथित आर्थिक गैरप्रकारांबाबत प्रश्न उपस्थित केले होते. त्यानंतर या प्रकरणाची दखल घेत कारवाई करण्यात आल्याचा उल्लेख अरबाजने आपल्या नव्या व्हिडिओमध्ये केला आहे.

अरबाजने आपल्या व्हिडिओच्या सुरुवातीलाच तुकाराम मुंढे यांचे आभार मानले. हॉस्पिटलविषयी यापूर्वीही अनेक नागरिकांनी तक्रारी केल्या होत्या. मात्र, या तक्रारींची तातडीने दखल घेऊन कारवाई करण्याची भूमिका मुंढे यांनी घेतल्याचे अरबाजने म्हटले आहे. वैद्यकीय क्षेत्रात काही ठिकाणी रुग्णांकडून मोठ्या प्रमाणात पैसे घेतले जात असल्याच्या तक्रारी समोर येतात. मात्र, या प्रक्रियेत संबंधित हॉस्पिटलची भूमिका आहे का, याचाही तपास होणे आवश्यक असल्याचे अरबाजने म्हटले आहे.

अरबाजने आपल्या व्हिडिओमध्ये वैद्यकीय क्षेत्रातील काही पद्धतींबाबत प्रश्न उपस्थित केले आहेत. एका डॉक्टरने रुग्णाला दुसऱ्या डॉक्टरकडे किंवा हॉस्पिटलमध्ये पाठवल्यानंतर त्यामागे आर्थिक कमिशन दिले जाते का, असा प्रश्न त्याने उपस्थित केला. याशिवाय रुग्णांना ॲम्ब्युलन्स उपलब्ध करून देताना होणारे कथित आर्थिक व्यवहार आणि सीटी स्कॅनसारख्या तपासण्यांसाठी रुग्णांना विशिष्ट ठिकाणी पाठवताना कमिशनची देवाणघेवाण होते का, याचीही चौकशी व्हावी, अशी मागणी त्याने केली आहे. मात्र, हे सर्व आरोप असून त्यांची स्वतंत्र आणि पारदर्शक चौकशी होणे आवश्यक असल्याचे त्याने स्पष्ट केले आहे.

राज्यातील हॉस्पिटल्स नियमांनुसार नोंदणीकृत आहेत का, याचीही तपासणी करण्याची गरज असल्याचे अरबाजने म्हटले आहे. कोणत्या हॉस्पिटलची आवश्यक नोंदणी आहे आणि कोणते हॉस्पिटल नियमांचे पालन करत नाही, याची माहिती समोर येणे गरजेचे असल्याचे त्याचे म्हणणे आहे. आपल्या कुटुंबासोबतही अशाच प्रकारचा अनुभव आल्याचे अरबाजने सांगितले. त्या वेळी तुकाराम मुंढे यांनी कारवाई केल्याबद्दल त्याने वैयक्तिकरित्या त्यांचे आभार मानले आहेत.

तुकाराम मुंढे यांच्या कारवाईच्या पद्धतीचे कौतुक करताना अरबाजने महाराष्ट्राला प्रामाणिकपणे आणि नियमांनुसार कारवाई करणाऱ्या अधिकाऱ्यांची गरज असल्याचे म्हटले आहे. आपल्या कुटुंबाच्या अनुभवाच्या पार्श्वभूमीवर मुंढे यांनी घेतलेल्या भूमिकेबद्दल आपण त्यांचे आभारी असल्याचेही त्याने सांगितले. दरम्यान, तुकाराम मुंढे यांच्याकडून करण्यात येणाऱ्या कारवायांमुळे सोशल मीडियावरही त्यांची चर्चा होत आहे. एखाद्या ठिकाणी नियमबाह्य प्रकार किंवा गैरप्रकार आढळल्याचा दावा नागरिकांकडून करण्यात आला, तर काही जण थेट मुंढे यांना टॅग करून संबंधित माहिती देत आहेत.

अरबाजने या व्हिडिओसोबत एक कॅप्शनही लिहिले आहे. 'रुग्ण हा ग्राहक नाही, तो एक माणूस आहे' असा संदेश त्याने दिला आहे. मात्र, सर्व डॉक्टर किंवा हॉस्पिटल्स गैरप्रकार करतात, असा आपला दावा नसल्याचेही अरबाजने स्पष्ट केले आहे. आजही अनेक डॉक्टर आणि हॉस्पिटल्स प्रामाणिकपणे, माणुसकीच्या भावनेने आणि सेवाभावाने रुग्णांवर उपचार करत असल्याचे त्याने नमूद केले आहे. अशा डॉक्टर आणि हॉस्पिटल्सबद्दल आपल्याला पूर्ण आदर असल्याचे त्याने सांगितले.आपला मुद्दा हा प्रामाणिक डॉक्टरांच्या विरोधात नसून, रुग्णांच्या अडचणीचा किंवा त्यांच्या मजबुरीचा गैरफायदा घेणाऱ्या पद्धतींविरोधात असल्याचे अरबाजने स्पष्ट केले आहे.

अरबाज शेखच्या वडिलांचे काही दिवसांपूर्वी निधन झाले. त्याआधी वडील हॉस्पिटलमध्ये उपचार घेत असताना अरबाजने सोशल मीडियावर एक व्हिडिओ शेअर केला होता. त्यामध्ये त्याने हॉस्पिटलशी संबंधित काही अनुभव आणि कथित आर्थिक गैरप्रकारांविषयी प्रश्न उपस्थित केले होते. यानंतर आता त्याने पुन्हा व्हिडिओ शेअर करत तुकाराम मुंढे यांचे आभार मानले आहेत. त्यामुळे अरबाजची ही पोस्ट सोशल मीडियावर चर्चेचा विषय ठरत आहे.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २० सप्टेंबर २०२६


## इकरा पब्लिक स्कूलमध्ये पालक-शिक्षक मेळावा उत्साहात





**जळगाव :** इकरा पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, जळगाव येथे इयत्ता पाचवी ते सातवीच्या विद्यार्थ्यांसाठी पालक-शिक्षक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. नुकत्याच घेण्यात आलेल्या प्रथम घटक चाचणी परीक्षेच्या निकालाची माहिती यावेळी पालकांना देण्यात आली. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीचा आढावा घेण्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्याची स्वतंत्र वैयक्तिक शैक्षणिक फाईल तयार करण्यात आली असून, त्यामध्ये विद्यार्थ्यांचा शैक्षणिक रेकॉर्ड जतन करण्यात आला आहे.पालकांना त्यांच्या पाल्याचा रेकॉर्ड दाखवून शिक्षकांनी शैक्षणिक प्रगती व आवश्यक सुधारणांबाबत मार्गदर्शन केले. मेळाव्यास पालकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.यावेळी विद्यालयाचे प्राचार्य शेख शकील यांनी पालकांना मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी पालक, शिक्षक आणि विद्यार्थी या तिन्ही घटकांनी समन्वयाने कार्य करणे आवश्यक असल्याचे सांगितले. शफीक अंसारी सर यांनी सेमी-इंग्लिश माध्यमाची माहिती देत पालकांनी विद्यार्थ्यांच्या अभ्यासाकडे विशेष लक्ष देण्याचे आवाहन केले. पालकांच्या वतीने डॉक्टर अशफाक काकर व इसहाक पिंजारी सर यांनी विद्यालयाकडून विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी करण्यात येणाऱ्या प्रयत्नांचे कौतुक केले.तसेच शिष्यवृत्ती, क्रीडा, मिशन AICU, इंटरमिजिएट, कॅलिग्राफी आणि MSCIT यांसारख्या विविध उपक्रमांचे त्यांनी विशेष कौतुक केले.मेळाव्यादरम्यान साजेद खान सर, शफीक अंसारी व तुबा मॅडम यांनी पालकांना विद्यार्थ्यांचे निकाल व शैक्षणिक रेकॉर्ड समजावून सांगत वैयक्तिक समुपदेशन केले.

पालकांनीही शिक्षकांशी संवाद साधून आपल्या पाल्याच्या शैक्षणिक प्रगतीबाबत माहिती घेतली. विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी शाळा आणि पालक यांच्यात सातत्यपूर्ण संवाद व समन्वय आवश्यक असून, संयुक्त प्रयत्नांतून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेला आणि सर्वांगीण विकासाला नवी दिशा मिळेल, असा सकारात्मक संदेश या पालक-शिक्षक मेळाव्यातून देण्यात आला.

## कवी लक्ष्मण वाल्डे यांच्या टेलर कविता संग्रहाचे प्रकाशन



**कन्नड (अरुण थोरात):** टेलर समाजाचे श्रमजीवन, वेदना, संघर्ष आणि जगण्याचे वास्तव कवितेच्या माध्यमातून प्रभावीपणे मांडणाऱ्या कन्नड येथील युवाकवी लक्ष्मण वाल्डे यांच्या 'टेलर' या कविता संग्रहाचे प्रकाशन लोकनेते सहकारमहर्षी बाळासाहेब पवार वाचनालयात उत्साहात झाले.व्यवसायाने टेलर असलेले ज्येष्ठ साहित्यिक निवृत्ती काळे (वैजापूरकर), कवीचे वडील गंगाधर वाल्डे व आई शांताबाई वाल्डे यांच्या हस्ते प्रकाशन झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी छत्रपती शिवाजी कॉलेजचे प्राचार्य डॉ. विजय भोसले होते.ज्येष्ठ लेखिका डॉ. प्रतिभा अहिरे यांनी संग्रहावर सखोल भाष्य करत नवोदित कवींना काव्यलेखना बाबत मार्गदर्शन केले. नायब तहसीलदार दिलीपकुमार सोनवणे यांनी कवीच्या साहित्यिक प्रयोगाचे कौतुक केले. संत साहित्याचे अभ्यासक डॉ. रामचंद्र झाडे यांनीही संग्रहाला शुभेच्छा दिल्या. ज्येष्ठ साहित्यिक निवृत्ती काळे यांनी संग्रहाची प्रस्तावना लिहिली असून, त्यांनी आपल्या मनोगतातून 'टेलर' च्या साहित्यिक वैशिष्ट्यांवर प्रकाश टाकला. ज्येष्ठ लेखक डॉ. शिवाजी हुसे यांनी टेलर वर्गाच्या समस्या, दुःख आणि संघर्षाचा व्यापक पट या संग्रहातून मांडल्याचे सांगितले.कार्यक्रमाची प्रस्तावना करताना कवी ज्ञानेश्वर गायके म्हणाले, "टेलर वर्गाचे दुःख, वेदना आणि जगण्याचे वास्तव यापूर्वी कथा-कादंबरीतून मांडले गेले आहे. मात्र कवितेसारख्या लघु साहित्यप्रकारातून या समाजाचा व्यापक जीवनपट मांडण्याचा आगळा प्रयोग लक्ष्मण वाल्डे यांनी केला आहे. अँड. कृष्णा पाटील जाधव यांनी संग्रहावर भाष्य करत कवीच्या ग्रामीण जीवनानुभवांवर आधारित कविता सादर केली. यावेळी पत्रकार, तिफण परिवाराचे सदस्य, साहित्यिक, कवी, विविध क्षेत्रांतील मान्यवर आणि साहित्यप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रवीण दाभाडे यांनी केले, तर आभार कवी लक्ष्मण वाल्डे यांनी मानले.

## खामगावमध्ये घरोघरी गौरी पूजन उत्साहात संपन्न



**फुलंब्री :** गणरायाच्या आगमनानंतर सर्वांना वेध लागतात ते गौरीच्या आगमनाचे. गुरुवारी (दि. १७) 'आली गवर आली... सोन पावलांनी आली...' अशा पारंपरिक गीतांनी घरोघरी ज्येष्ठा-कनिष्ठा गौरीचे मोठ्या थाटात आगमन झाले. घरातील सुहासिनींनी वाजत-गाजत, औक्षण करून गौराईची मनोभावे स्थापना केली.शालू, पैठणी नेसून, दागदागिने घालून गौराईचा शृंगार करण्यात आला. शुक्रवारी अनुराधा नक्षत्रावर ज्येष्ठा-कनिष्ठा गौरीचे पूजन करण्यात आले.

१६ भाज्या, १६ कोशिंबिरी, १६ चटण्या व विविध पक्वान्नांचा नैवेद्य दाखविण्यात आला. महालक्ष्मी स्थापनेमुळे घरात सुख, शांती आणि समृद्धी लाभते, अशी भाविकांची श्रद्धा आहे.मूळ नक्षत्रावर गौराईचे विसर्जन करण्यात आले.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २० सप्टेंबर २०२६

## विचार मंथन करावे जरा!

सांगतो शब्दात माझ्या,
आजच्या तरुणाईची व्यथा.
अवेळी जग सोडून जाताच,
बनू लागली करुण कथा. १

मित्रांनो का अशी वेळ यावी,
विचार मंथन करावे जरा.
नैराश्यात जीवन संपविणे,
हाच एक मार्ग नाही खरा. २

स्वत:चे कौशल्य ओळखा,
नैराश्य जाईल पळून दूर.
जन्मदात्या आई बापाच्या,
डोळ्यात येणार नाही पूर. ३

येणाऱ्या संकटांचा सामना,
वीर धुरंदर होऊन करावे.
संकटांच्या छाताडावर बसून,
संकटांना सदैव पुरून उरावे. ४

रात्रंदिन काबाडकष्ट करून,
आई बाप वेदना सोसतात.
मुलं शिकून खूप मोठे व्हावे,
दु:ख भोगून मुलांना पोसतात. ५

मित्रांनो जिंदगीच्या शर्यतीत,
निराशेने हार का बरे मानावे.
हार मानण्या अगोदर मित्रांनो,
आई वडिलांचे कष्ट जाणावे. ६



**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**

प्रवेश सुरू

बी.ए. मराठी व उर्दू माध्यम

एम.ए मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू

बालसंगोपन

डीप्लोमा गांधी विचार

मानवी हक्क प्रमाणपत्र

संपर्क

9405109103

## मनपाच्या खुले प्लॉट आणि बांधकाम गुंठेवारी साठी जनहितार्थ किमान सहा महीने मुदतवाद द्या - राजेंद्र दाते पाटील



**छत्रपती संभाजीनगर :** महानगर पालिका छत्रपती संभाजीनगर गुंठेवारी योजनेत खुले प्लॉट व बांधकाम अधिकृत करण्या साठी दुष्काळ सदृश स्थितीपाहता सहा महिने जुन्या निर्णया प्रमाणे मुदत वाढ देण्याचे आदेश तात्काळ करा अशी मागणी जन आंदोलन विकास कृती समिती महाराष्ट्र राज्य अध्यक्ष डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी एकनाथराव शिंदे उप मुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री महाराष्ट्र शासन यांचे कडे जनहितार्थ केली आहे.त्यांनी असे नमुद केले आहे की, महानगर महापालीका छत्रपती संभाजीनगर येथे गुंठेवारी योजने अंतर्गत घरे व खुले प्लॉट सवलतीच्या योजनेत नियमानुकूल करून घेण्याची मोहीम सुस्थितीत सुरु आहे. दुष्काळ सदृश स्थितीमुळे नागरिक हतबल झालेले असल्यामुळे सप्टेंबर महिन्या पर्यंत मुदत दिली होती ही मुदत वाढ किमान सहा महिने होणेअत्यावश्यक आहे. अचानकपणे मनपा आयुक्त यांनी ३१ ऑक्टोबर २०२६ पर्यंतच प्लॉट,घराच्या गुंठेवारीसाठी अखेरची मुदत देण्याचा निर्णय केला असुन हा अंत्यन्त अन्याय कारक ठरणार असुन यात भरीसभर म्हणुन ०१नोव्हेंबर २०२६ पासून अनधिकृत घरे पाडण्याची मोहीम सुरू करण्याची घोषणा ही तर गोरगरीब जनतेने प्रचंड मेहनतीने प्राप्त केलेली सदरची मालमत्ता पडण्याचा निर्णय निवारा यासंकल्पनेवर घाला घालण्याचा अन्याय कारक निर्णय आहे.पुढे ते म्हणतात की,गुंठेवारी योजनेत खुले प्लॉट अधिकृत करण्यासाठी महापालिकेने १५ सप्टेंबर पर्यंत मुदत दिली होती. ही मुदत वाढविण्याचा निर्णय आयुक्त अमोल येडगे यांनी गुरुवारी घेतला तो फक्त ३१ऑक्टोबर २०२६ पर्यंतच असुन नागरिकांना खुले प्लॉट आणि घरांची गुंठेवारी चार्जेसमध्ये ५० टक्के सूट देण्यात आली आहे.घरांसाठी बेटरमेंट चार्ज १०० टक्के ड्रोनद्वारे सर्वेक्षण करणार माफ केला आहे. सोबतच अन्सलरी आणि साइड मार्जिन वरील प्रत्येकी दहा टक्के लावण्यात येणारा दंडही माफ केलाआहे.गुंठेवारीत पूर्वी आकारण्यात येणारा ६० टक्के दंड आता माफ झाला आहे. त्यामुळे नागरिकांकडून सध्या चांगला प्रतिसादमिळत असुन ०१एप्रिल ते १५ सप्टेंबर पर्यंत गुंठेवारी योजनेतून ५७ कोटी २९ लाख रुपये मनपास प्राप्त झाले असुन आता गुंठेवारी योजनाच पूर्ण पणे बंद करण्याचा आयुक्ताचा मानस जनविरोधी असुन अगदी मंगळवारी या शेवटच्या दिवशी १२ते १५ कोटी रुपये नागरिकांच्या वतीने भरले जातील अशी अपेक्षा असुन ही बाब मनपाच्या उत्पन्नास भर घालणारे असुन सहा महिने मुदत वाढ म्हणजे मनपाच्या उत्पन्नात भर घालणारा शासनाचा सकारात्मक निर्णय ठरेल असेही जन आंदोलन विकास कृती समिती महाराष्ट्र छत्रपती संभाजीनगरचे अध्यक्ष डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी केले असुन याच मुळे त्यांनी नगरविकास मंत्र्यांना विनंती केली आहे की, महानगर पालिका छत्रपती संभाजीनगर गुंठेवारी योजनेत खुले प्लॉट व बांधकाम अधिकृत करण्या साठी दुष्काळ सदृश स्थिती पाहता सहा महिने जुन्या दर व निर्णया प्रमाणे मुदत वाढ देण्याचे आदेश तात्काळ जनहितार्थ व्हावेत ही नम्र विनंती त्यांनी केली असुन सदरचे निवेदन तात्काळ नगरविकास मंत्र्यांना पाठविण्यात येणार असल्याची माहिती जन आंदोलन विकास कृती समिती महाराष्ट्र छत्रपती संभाजीनगरचे अध्यक्ष डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी दिली आहे.

## मातोश्री रमाबाई आंबेडकर हायस्कूल, सिडको एन-७ येथील विद्यार्थ्याची क्रीडा प्रबोधिनी नागपूर येथे हँडबॉलसाठी निवड




**छत्रपती संभाजीनगर :** येथील मातोश्री रमाबाई आंबेडकर हायस्कूल, सिडको एन-७ येथे इयत्ता नववीमध्ये शिक्षण घेत असलेल्या सविधान सुमेध निकाळजे या विद्यार्थ्यांची विभागीय क्रीडा संकुल, कोराडी रोड, नागपूर येथे घेण्यात आलेल्या क्रीडा कौशल्य चाचणीत त्यांने आपल्या उत्कृष्ट क्रीडा कौशल्याचे प्रदर्शन केले. त्याच्या कामगिरीची दखल घेत हँडबॉल या खेळासाठी त्याची निवड करण्यात आली.सविधानच्या या उल्लेखनीय यशाबद्दल मातोश्री रमाबाई आंबेडकर हायस्कूलचे मुख्याध्यापक श्री सी एस चव्हाण, क्रिडा शिक्षक श्री आर.एम. दिवेकर शिक्षकवृंद श्री एस आर चव्हाण, श्री बी के गडहीरे शिक्षकेतर कर्मचारी श्री एस जे पांडे, श्री डी व्ही म्हस्के, श्री एस आर देहरे यांनी त्याचा त्याचे वडील श्री सुमेध निकाळजे आई सौ वर्षा निकाळजे यांचा शाळेच्या वतीने बुके देवून सत्कार करुन त्यांचे अभिनंदन केले व पुढील क्रीडा वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. त्यांच्या या यशामध्ये हँडबॉल प्रशिक्षक सुयश साळवे, सचिव प्रा. सत्यजित पगारे तसेच अमित प्रधान, निखिल म्हस्के इत्यादींचा वाटा आहे.सविधानच्या यशामुळे शाळेच्या क्रीडा क्षेत्रातील कामगिरीत आणखी एक मानाचा तुरा रोवला असून, त्याच्या निवडीबद्दल शाळा व परिसरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड प्रिंटर्स

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.
मो. 8087880274, 8956362639, 9270446603, 9405109103

डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ट कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274
Email - sahilcomputer05@gmail.com

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २० सप्टेंबर २०२६


## काळजाला पीळ पाडणारी कविता - टुडेज वेदर इन करंट लोकेशन



**म**राठवाड्याच्या एखाद्या दुष्काळी गावात दुपारच्या वेळी भेगा पडलेल्या वावराकडे पाहिलं की काळजाला पीळ पडतो. याच पीळातून मराठवाड्याचे लोककवी लक्ष्मण खेडकर यांनी एक कविता लिहिली आहे. लक्ष्मण खेडकर हे काही पुस्तकी कवी नाहीत. ते मातीतले कवी आहेत. त्यांचा जन्म मराठवाड्याच्या मातीतला, त्यांची भाषा मराठवाडी बोलीतली आणि त्यांचे विषय शेतकऱ्याच्या बांधावरचे. ते जे पाहतात तेच लिहितात, त्यामुळे त्यांच्या कविता कागदावरच्या वाटत नाहीत, त्या बांधावरच्या वाटतात. त्यांची ही कविता आज सोशल मीडियावर व्हायरल झाली आहे कारण ती प्रत्येकाच्या घरातली वाटते. कवी लक्ष्मण खेडकर यांनी दुष्काळाचं हे विदारक सत्य फार सोप्या शब्दात मांडलं आहे.कवी लक्ष्मण खेडकर यांची मुळ कविता अशी आहे -वावरात यढा करून आला,पीकानं माना टाकल्या पाहून अर्धा जीव गेला.बांधावरच्या झाडाखाली बसून,पाणी घेतो घटाघटा,डोक्याला हात लावून म्हणतो,औंदा काही खरं नाही भौ.पोळा झाला की पाऊस भोळा,शेजारी सांगतो तुमच्या अमक्या साहेबाने सांगितली होती मुसळधार,तो म्हणतो पावसाच्या, पुढाऱ्यांच्या अन् हवामान तज्ञांच्या,काही खऱ्या नाही राहिल्या बाता.बायको म्हणते गेला पाऊस गणपतीला येतो,कालच तर बसल्या महालक्ष्म्या,आज हात धुवायला नाही,तर उद्या वाट लावायला नक्की येईल.आणि पोरगं मोबाईलवर सर्च करतंय,"टुडेज वेदर इन करंट लोकेशन"- कवी लक्ष्मण खेडकरही कविता काळजाला पीळ का पाडते याचं उत्तर कवी लक्ष्मण खेडकर यांच्या पहिल्या दोन ओळींमध्येच आहे. वावरात यढा करून आला, हे वाक्य फक्त मराठवाड्यातला माणूसच लिहू शकतो. यढा करणं म्हणजे जमीन नांगरणं, वखरणं. सकाळी पाच वाजता अंधारात उठून शेतकरी वावरात जातो. त्याने काळ्या आईची मशागत केली आहे. पण जमिनीत ओलच नाही. त्याने कसंबसं पीक उभं केलं आहे, पण पाणी नाही म्हणून त्या पिकाने माना टाकल्या आहेत. ते पाहून त्याचा अर्धा जीव जातो. कवी लक्ष्मण खेडकर यांनी अर्धा जीव जाणं हा अनुभव स्वतः पाहिला आहे. त्यामुळे तो शब्द काळजाला भिडतो. तो बांधावर बसतो, घटाघटा पाणी पितो आणि म्हणतो औंदा काही खरं नाही भौ. या चार ओळींमध्ये दुष्काळाची सुरुवात, शेतकऱ्याची मेहनत आणि त्याच्या पदरी पडलेलं अपयश सगळं आलं आहे.दुसऱ्या कडव्यात कवी लक्ष्मण खेडकर दुष्काळाच्या राजकारणावर भाष्य करतात. पोळा झाला की पाऊस भोळा, या एका ओळीत मराठवाड्याच्या हवामानात झालेला बदल त्यांनी पकडला आहे. पोळा हा शेतकऱ्याचा सण, पण आता पोळा झाला की पाऊस गायब होतो. शेजारी येऊन सांगतो टीव्हीवर साहेबाने मुसळधार सांगितली होती. पण शेतकरी वैतागून म्हणतो, पावसाच्या, पुढाऱ्यांच्या आणि हवामान तज्ञांच्या काही खऱ्या नाही राहिल्या बाता. या एका वाक्यात मराठवाड्याच्या दुष्काळाचं सगळं राजकारण मांडलं आहे. दुष्काळ जाहीर झाला की पुढारी येतात, फोटो काढतात आणि निघून जातात. हवामान खातं एक सांगतं आणि होतं दुसरंच. त्यामुळे शेतकऱ्याचा विश्वासच उडाला आहे. कवी खेडकर हे वास्तव थेट आणि बोचऱ्या भाषेत मांडतात.तिसरं कडवं कवी खेडकर यांनी मराठवाड्यातल्या बाईच्या हिंमतीला समर्पित केलं आहे. बायको म्हणते गेला पाऊस गणपतीला येतो, कालच तर बसल्या महालक्ष्म्या, आज हात धुवायला नाही तर उद्या वाट लावायला नक्की येईल. कवी खेडकर यांनी इथे बाईच्या तोंडी जे तत्वज्ञान दिलं आहे ते फक्त मराठवाड्यातल्या बाईच्याच तोंडी शोभतं. तिला फार काही नको, आज थोडं पाणी मिळालं नाही तरी चालेल, पण उद्या पिकाला वाचवेल एवढं तरी मिळू दे. दुष्काळात तीच खरी लढवय्यी असते. तिच्या या शब्दात आशा आहे आणि जगण्याची जिद्द आहे.आणि शेवटच्या दोन ओळींमध्ये कवी लक्ष्मण खेडकर यांनी आजच्या काळाचं सगळ्यात मोठं सत्य मांडलं आहे. पोरगं मोबाईलवर सर्च करतंय टुडेज वेदर इन करंट लोकेशन. ज्या बापाने आभाळाचा रंग पाहून पावसाचा अंदाज लावला, त्याचाच मुलगा आज गुगलला विचारतोय. घरात प्यायला पाणी नाही, पण हातात स्मार्टफोन आहे. वावरात पीक नाही, पण मोबाईलमध्ये फुल नेटवर्क आहे. करंट लोकेशन म्हणजे त्याचं वावर, पण त्या वावरात पाऊस पडणार की नाही हे सांगायला त्याला गुगलची मदत घ्यावी लागते. जिथं ढग नाहीत तिथं नेटवर्क आहे, पण नेटवर्क असूनही पाऊस नाही. हीच आजच्या दुष्काळाची व्याख्या आहे. म्हणूनच कवी लक्ष्मण खेडकर यांची ही कविता काळजाला पीळ पाडते आणि काळजात घर करते.

**डॉ. शिवाजी हुसे**
('आता उठवू सारे रान ‘ या सदरातील लेख )

## माधवराव पाटील कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये जागतिक फार्मासिस्ट सप्ताह साजरा



**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले)** : जागतिक फार्मासिस्ट दिन, राष्ट्रीय फार्मसी सप्ताह २०२६ व ६ वे राष्ट्रीय औषधसुरक्षा दक्षता सप्ताह २०२६ यानिमित्त माधवराव पाटील कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये ता. १५ ते १९ सप्टेंबर २०२६ या कालावधीत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी हॉलीबॉल संघाचे उद्घाटन नगर शिक्षण विकास मंडळाचे अध्यक्ष बापूराव पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. सप्ताहादरम्यान रांगोळी, व्हॉलिबॉल, बुद्धिबळ (चेस), बॅडमिंटन, रस्सीखेच तसेच राज्यस्तरीय तांत्रिक रील स्पर्धा अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. महेश्वर गुरुनाथ होगाडे, माधवराव पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. चंद्रकांत बिराजदार, महाविद्यालयातील प्राध्यापक, प्राध्यापिका व शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी मार्गदर्शन करताना बापूराव पाटील यांनी विद्यार्थ्यांनी अभ्यासासोबतच खेळाची आवड जोपासली पाहिजे. शारीरिक तंदुरुस्ती ही निरोगी आणि यशस्वी जीवनासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. भविष्यातील सक्षम फार्मासिस्ट घडविण्यासाठी औषधसुरक्षा दक्षतेचे महत्त्व अधोरेखित करत औषधांचा विवेकपूर्ण व सुरक्षित वापरास प्रोत्साहन देणे हे सुरक्षित आरोग्यसेवेच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल आहे. विद्यार्थ्यांमध्ये फार्मसी क्षेत्राविषयी जागरूकता, औषधसुरक्षेबाबत जबाबदारी तसेच शारीरिक व मानसिक आरोग्याबाबत सकारात्मक दृष्टिकोन निर्माण होण्यास मदत होणार आहे. त्यांनी यावेळी जागतिक फार्मासिस्ट दिन सप्ताहाच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा दिल्या.

## बुद्धिबळ स्पर्धेत तृतीय क्रमांक कु. माहेश्वरी बनसोडेचे यश



**उमरगा : (प्रा. नागसेन कांबळे)** तालुक्यातील बलसुर येथे श्नी.छत्रपती शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील इ.१२ वी विज्ञान शाखेतील कु.माहेश्वरी बनसोडे या विद्यार्थिनींने तालुका स्तरीय (१९ वर्षे वयोगटात) बुद्धिबळ स्पर्धेत तृतीय क्रमांक पटकावला. आज तालुका स्तरीय बुद्धिबळ स्पर्धा सुपतगाव येथे संपन्न झाल्या. यात कु.माहेश्वरी बनसोडे हिने तृतीय क्रमांक पटकावल्यामुळे धाराशिव येथे होणाऱ्या जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी तीची निवड झाली आहे. या स्पर्धेसाठी तिला प्राचार्य श्नी .सतीश वाकडे, क्रीडाशिक्षक श्नी.दत्तात्रय जाधव व प्रा.बी.टी.जाधव यांचे मोलाचे मार्गदर्शन मिळाले. यामुळे तिचे सर्वत्र अभिनंदन आणि कौतुक होत असून पुढील स्पर्धेसाठी तिला सर्वांच्या वतीने हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.


### जाहिरात दर

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २० सप्टेंबर २०२६

# अल्झायमर : विस्मरणातही वृद्धत्वाचा सन्मान जपूया

**२१** सप्टेंबर हा दिवस जगभरात 'जागतिक अल्झायमर दिन' म्हणून पाळला जातो. अल्झायमर हा केवळ स्मरणशक्ती कमी होण्याशी संबंधित आजार नसून तो व्यक्तीच्या दैनंदिन जीवनावर, कुटुंबीयांशी असलेल्या संबंधांवर, सामाजिक सहभागावर आणि आत्मसन्मानावर परिणाम करणारी गंभीर आरोग्यविषयक आणि सामाजिक समस्या आहे. विशेषतः वृद्ध व्यक्तींमध्ये विस्मरणाच्या तक्रारी आढळल्यास त्याकडे केवळ 'वय झाले म्हणून असे होते' या दृष्टिकोनातून पाहणे योग्य नाही. वृद्धत्व ही जीवनाची नैसर्गिक अवस्था आहे; परंतु वृद्ध व्यक्तीच्या स्मरणशक्तीत होणारे गंभीर आणि सातत्यपूर्ण बदल हे तपासणी व योग्य वैद्यकीय मार्गदर्शनाची गरज दर्शवू शकतात. त्यामुळे जागतिक अल्झायमर दिन हा केवळ एका आजाराबद्दल जनजागृती करण्याचा दिवस नसून वृद्ध व्यक्तींच्या आरोग्याचा, सन्मानाचा, स्वायत्ततेचा आणि माणूस म्हणून त्यांच्या असलेल्या मूलभूत अधिकारांचा पुनर्विचार करण्याचा दिवस आहे.वृद्धत्वाकडे समाजाने अनेकदा दुर्बलता, परावलंबित्व आणि निष्क्रियता यांच्याशी जोडून पाहिले आहे. प्रत्यक्षात वृद्ध व्यक्तींच्या आयुष्यातील अनुभव, ज्ञान, कौशल्ये, सामाजिक संबंध आणि जीवनातून मिळालेली शिकवण ही कुटुंबाची तसेच समाजाची मौल्यवान संपत्ती असते. अनेक वृद्धांनी आपल्या कुटुंबाच्या उभारणीसाठी आयुष्यभर कष्ट केलेले असतात. शेती, उद्योग, व्यवसाय, नोकरी, शिक्षण, सामाजिक कार्य किंवा घरगुती जबाबदाऱ्या सांभाळताना त्यांनी पुढील पिढ्यांसाठी भक्कम आधार निर्माण केलेला असतो. त्यामुळे वय वाढले किंवा स्मरणशक्ती कमी झाली म्हणून व्यक्तीचे महत्त्व कमी होत नाही. अल्झायमरच्या आजारामुळे काही आठवणी पुसट होत गेल्या तरी त्या व्यक्तीचे आयुष्य, अनुभव, भावना, नाती आणि मानवी प्रतिष्ठा कायम असते. म्हणूनच अल्झायमरकडे पाहताना आजारापेक्षा आधी माणसाकडे पाहण्याची गरज आहे.सामान्य वृद्धत्वामध्ये काही प्रमाणात विस्मरण होणे स्वाभाविक असू शकते. एखादी वस्तू कुठे ठेवली हे क्षणभर आठवणे कठीण जाणे, एखाद्या व्यक्तीचे नाव लगेच आठवू न येणे किंवा एखादी गोष्ट आठवण्यासाठी थोडा अधिक वेळ लागणे यासारख्या घटना वयानुसार घडू शकतात. मात्र विस्मरणाचे प्रमाण वाढत जाऊन त्याचा दैनंदिन जीवनावर परिणाम होऊ लागला, परिचित व्यक्ती ओळखता येईनाशा झाल्या, नेहमीची कामे करण्यात अडचण निर्माण झाली, संभाषणात वारंवार गोंधळ होऊ लागला किंवा व्यक्ती परिचित ठिकाणीही दिशाभूल होऊ लागली तर त्याकडे गांभीर्याने पाहणे आवश्यक आहे. अल्झायमर हा स्मृतिभ्रंशाच्या प्रमुख कारणांपैकी एक आहे. त्यामुळे वृद्ध व्यक्तीच्या वर्तनातील किंवा स्मरणशक्तीतील सातत्यपूर्ण बदलांकडे दुर्लक्ष न करता वैद्यकीय तज्ज्ञांचा सल्ला घेणे महत्त्वाचे ठरते.अल्झायमरच्या संदर्भात सर्वांत मोठी समस्या म्हणजे त्याच्याभोवती असलेले गैरसमज होय. अनेक कुटुंबांमध्ये वृद्ध व्यक्ती विसरभोळ्या झाल्या की त्यांना 'वयामुळे असेच होते' असे सांगून विषय संपवला जातो. काही वेळा वृद्ध व्यक्ती वारंवार एकच प्रश्न विचारतात, एखादी गोष्ट पुन्हा सांगतात किंवा एखादी वस्तू चुकीच्या ठिकाणी ठेवतात म्हणून त्यांची चेष्टा केली जाते. अशा वर्तनामुळे वृद्ध व्यक्तीच्या मनावर खोल परिणाम होऊ शकतो. त्यांना आपण कुटुंबासाठी ओझे आहोत, आपल्यामुळे इतरांना त्रास होतो किंवा आपली किंमत उरलेली नाही, अशी भावना निर्माण होऊ शकते. त्यामुळे विस्मरणाची लक्षणे दिसणाऱ्या वृद्ध व्यक्तीशी संयमाने, प्रेमाने आणि आदराने संवाद साधणे ही कुटुंबाची महत्त्वाची जबाबदारी आहे.आधुनिक जीवनशैलीमुळे कुटुंबव्यवस्थेत मोठे बदल झाले आहेत. संयुक्त कुटुंबांची संख्या कमी होऊन लहान कुटुंबांची संख्या वाढली आहे. रोजगार, शिक्षण आणि स्थलांतराच्या कारणामुळे मुलांना आपल्या वृद्ध आई-वडिलांपासून दूर राहावे लागते. अशा परिस्थितीत वृद्ध व्यक्तींच्या शारीरिक आरोग्याबरोबरच त्यांच्या मानसिक आणि सामाजिक आरोग्याचा प्रश्नही महत्त्वाचा ठरतो. एकटेपणा, संवादाचा अभाव, सामाजिक सहभाग कमी होणे आणि भावनिक आधाराची कमतरता यामुळे वृद्ध व्यक्ती अधिक असुरक्षित होऊ शकतात. अल्झायमर किंवा इतर प्रकारच्या स्मृतिभ्रंशाची लक्षणे असलेल्या वृद्धांसाठी ही परिस्थिती अधिक आव्हानात्मक असते. त्यामुळे वृद्धांची काळजी ही केवळ औषधे देण्यापुरती मर्यादित न राहता त्यांच्याशी नियमित संवाद साधणे, त्यांच्या भावना समजून घेणे आणि त्यांना सामाजिक जीवनात सहभागी करून घेणे आवश्यक आहे.अल्झायमरच्या रुग्णांची काळजी घेताना कुटुंबीयांची भूमिकाही अत्यंत महत्त्वाची असते. मात्र ही जबाबदारी एका व्यक्तीवर टाकल्यास काळजीवाहू व्यक्तीवर शारीरिक, मानसिक आणि आर्थिक ताण वाढू शकतो. वृद्ध व्यक्तीची काळजी घेणाऱ्या कुटुंबीयांना अनेकदा झोपेचा अभाव, सततची चिंता, वेळेचे बंधन, आर्थिक खर्च आणि सामाजिक जीवनातील मर्यादा यांचा सामना करावा लागतो. त्यामुळे अल्झायमरच्या रुग्णाची काळजी ही केवळ एका मुलाची, मुलीची किंवा जोडीदाराची जबाबदारी न राहता संपूर्ण कुटुंबाची सामूहिक जबाबदारी असली पाहिजे. घरातील प्रत्येक सदस्याने आपल्या क्षमतेनुसार वेळ देणे, काळजीची कामे वाटून घेणे आणि काळजीवाहू व्यक्तीलाही विश्रांती व भावनिक आधार देणे आवश्यक आहे.वृद्ध व्यक्तीच्या स्वाभिमानाचा प्रश्न येथे विशेष महत्त्वाचा आहे. स्मरणशक्ती कमी झाली म्हणून त्यांच्याशी लहान मुलाप्रमाणे वागणे, त्यांच्या निर्णयक्षमतेकडे पूर्णपणे दुर्लक्ष करणे किंवा प्रत्येक गोष्ट त्यांच्या हातातून काढून घेणे योग्य नाही. त्यांच्या क्षमतेनुसार त्यांना स्वतःची कामे करण्याची संधी देणे आवश्यक आहे. सुरक्षिततेचा विचार करताना त्यांची स्वायत्तताही जपली पाहिजे. कपडे निवडणे, आवडीचे अन्न सांगणे, घरातील छोट्या कामांत सहभागी होणे, परिचित व्यक्तींशी बोलणे किंवा आपल्या आवडीच्या उपक्रमात वेळ घालवणे यांसारख्या गोष्टी वृद्ध व्यक्तीला आत्मविश्वास देतात. 'तुम्हाला काहीच कळत नाही' अशी भूमिका घेण्याऐवजी 'तुम्ही काय करू शकता आणि आम्ही कुठे मदत करू शकतो' हा दृष्टिकोन अधिक मानवी आहे.वृद्ध व्यक्तींच्या मानसिक आरोग्याकडेही तितक्याच गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. वाचन, संगीत ऐकणे, जुन्या आठवणी सांगणे, कुटुंबातील मुलांशी संवाद साधणे, प्रार्थना किंवा ध्यानधारणा करणे, घरातील हलकी कामे करणे, बागकाम, फिरणे किंवा सामाजिक कार्यक्रमांत सहभागी होणे अशा उपक्रमांमुळे वृद्धांना मानसिक आणि सामाजिक सक्रियता मिळू शकते. अर्थात, कोणताही उपक्रम हा व्यक्तीच्या आरोग्यस्थिती, आवडी आणि क्षमतेनुसार असावा. 'काहीच करू नका, विश्रांती घ्या' अशी सततची भूमिका वृद्धांना अधिक एकाकी करू शकते. वृद्धत्व म्हणजे जीवनापासून निवृत्ती नव्हे; तर आयुष्याच्या अनुभवांना नव्या स्वरूपात जगण्याची संधी आहे.आरोग्यदायी जीवनशैलीलाही अल्झायमर आणि इतर स्मृतिभ्रंशाच्या संदर्भात महत्त्व आहे. नियमित शारीरिक हालचाल, संतुलित आहार, पुरेशी झोप, रक्तदाब आणि मधुमेहासारख्या आरोग्यविषयक स्थितींचे नियंत्रण, धूम्रपान व तंबाखूजन्य पदार्थांपासून दूर राहणे आणि सामाजिक व मानसिक सक्रियता यांचा एकूण मेंदूच्या आरोग्याशी संबंध आहे. मात्र यापैकी कोणतीही गोष्ट अल्झायमरपासून पूर्ण संरक्षणाची हमी देत नाही. त्यामुळे 'हा आजार केवळ जीवनशैलीमुळे होतो' किंवा 'योग्य आहार घेतला तर तो होणारच नाही' असे अतिसुलभीकरण टाळणे आवश्यक आहे. वृद्ध व्यक्तीच्या आरोग्यात बदल जाणवल्यास तज्ज्ञांचा सल्ला घेणे हाच योग्य मार्ग आहे.ग्रामीण भागातील वृद्ध व्यक्तींच्या संदर्भात हा प्रश्न आणखी गुंतागुंतीचा होतो. गावांमध्ये अनेक वृद्ध शेती, घरगुती कामे किंवा पशुपालनाशी संबंधित कामे करत असतात. त्यांच्याकडे औपचारिक आरोग्यसेवा सहज उपलब्ध असेलच असे नाही. आर्थिक मर्यादा, वाहतुकीची अडचण, तज्ज्ञ डॉक्टरांची कमतरता आणि अल्झायमरविषयी अपुरी माहिती यामुळे निदानाला विलंब होऊ शकतो. काही वेळा कुटुंबातील तरुण सदस्य रोजगारासाठी शहरात किंवा परदेशात गेलेले असतात आणि वृद्ध व्यक्ती गावात एकट्या राहतात. अशा परिस्थितीत प्राथमिक आरोग्यव्यवस्था, समुदाय आरोग्य कर्मचारी, स्थानिक सामाजिक संस्था आणि ग्रामस्तरीय यंत्रणांनी वृद्धांच्या मानसिक आरोग्याकडेही लक्ष देणे आवश्यक आहे.अल्झायमरशी संबंधित आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे वृद्ध व्यक्तींची सुरक्षितता. स्मरणशक्ती आणि दिशाभान कमी झालेल्या व्यक्ती घराबाहेर पडून हरवू शकतात. गॅस, वीज, पाणी किंवा औषधांच्या वापरात चूक होऊ शकते. पैशांच्या व्यवहारात फसवणूक होण्याची शक्यता वाढू शकते. त्यामुळे घरातील वातावरण सुरक्षित करणे, आवश्यक संपर्क क्रमांक उपलब्ध ठेवणे, औषधांचे नियोजन करणे आणि आर्थिक व्यवहारांबाबत योग्य संरक्षण देणे गरजेचे आहे. मात्र सुरक्षिततेच्या नावाखाली वृद्ध व्यक्तीला पूर्णपणे बंदिस्त करणे किंवा त्यांच्या प्रत्येक हालचालीवर अनावश्यक नियंत्रण ठेवणे योग्य नाही. सुरक्षितता आणि स्वातंत्र्य यांच्यात संतुलन साधणे आवश्यक आहे.वृद्ध व्यक्तींच्या आर्थिक सुरक्षिततेकडेही समाजाने अधिक गांभीर्याने पाहिले पाहिजे. स्मरणशक्ती कमी झालेल्या व्यक्तींना कागदपत्रे, बँक व्यवहार, दूरध्वनीवरील फसवणूक किंवा डिजिटल व्यवहार समजून घेण्यात अडचणी येऊ शकतात. आज डिजिटल व्यवहार वाढत असताना वृद्धांना डिजिटल फसवणुकीपासून सुरक्षित ठेवणे हे कुटुंबाचे आणि समाजाचेही कर्तव्य आहे. त्यांच्या पैशांवर किंवा मालमत्तेवर त्यांची असहायता लक्षात घेऊन कोणाचाही गैरफायदा होऊ नये, यासाठी कुटुंबीयांनी पारदर्शकता आणि विश्वासाचे वातावरण निर्माण करणे आवश्यक आहे. वृद्धत्व आणि विस्मरण यांचा फायदा घेऊन आर्थिक शोषण करणे ही गंभीर सामाजिक समस्या आहे.आरोग्यव्यवस्थेनेही वृद्धांच्या वाढत्या गरजांचा विचार करून सेवा अधिक सुलभ करणे आवश्यक आहे. वृद्धांच्या आरोग्य तपासणीत केवळ रक्तदाब, मधुमेह किंवा इतर शारीरिक आजारांपुरते लक्ष न देता स्मरणशक्ती, मानसिक आरोग्य, दैनंदिन कार्यक्षमता आणि सामाजिक परिस्थिती यांचाही विचार व्हायला हवा. प्राथमिक आरोग्य केंद्रांपासून जिल्हास्तरावरील रुग्णालयांपर्यंत वृद्धांसाठी समन्वित आरोग्यसेवा उपलब्ध होणे आवश्यक आहे. अल्झायमरचे निदान आणि व्यवस्थापन ही दीर्घकालीन प्रक्रिया असू शकते. त्यामुळे कुटुंबाला वैद्यकीय उपचारांसोबत समुपदेशन, काळजीवाहू प्रशिक्षण आणि सामाजिक आधाराचीही गरज असते.समाजाने वृद्ध व्यक्तींना 'उपयोग नसलेला घटक' मानण्याची मानसिकता बदलली पाहिजे. निवृत्तीनंतर व्यक्तीचे सामाजिक योगदान संपत नाही. वृद्ध व्यक्ती आपल्या अनुभवातून कुटुंबाला मार्गदर्शन करू शकतात, स्थानिक इतिहास आणि संस्कृतीची माहिती पुढील पिढीपर्यंत पोहोचवू शकतात, मुलांना जीवनमूल्ये सांगू शकतात आणि सामाजिक उपक्रमांत सहभागी होऊ शकतात. अल्झायमरची लक्षणे असलेल्या व्यक्तीलाही तिच्या क्षमतेनुसार सामाजिक सहभागाची संधी दिली पाहिजे. तिच्या आयुष्यातील जुन्या आठवणींना महत्त्व देणे, छायाचित्रे पाहून संवाद साधणे, परिचित संगीत ऐकणे किंवा जुन्या अनुभवांबद्दल बोलण्याची संधी देणे यामुळे भावनिक जवळीक निर्माण होऊ शकते.जागतिक अल्झायमर दिनाच्या निमित्ताने माध्यमांची भूमिकाही महत्त्वाची ठरते. अल्झायमरचे चित्रण केवळ विस्मरण, असहायता किंवा दुःख यापुरते मर्यादित न राहता वृद्ध व्यक्तीच्या मानवी अस्तित्वाला केंद्रस्थानी ठेवले पाहिजे. समाजात जागृती निर्माण करताना भीती पसरवण्याऐवजी माहिती, संवेदनशीलता आणि योग्य आरोग्यविषयक मार्गदर्शन देणे आवश्यक आहे. 'विसरभोळा वृद्ध' म्हणून विनोदाचा विषय बनवण्याऐवजी त्यामागील आरोग्यविषयक कारण समजून घेण्याची वृत्ती विकसित झाली पाहिजे. जनजागृती म्हणजे केवळ आजाराची माहिती देणे नव्हे; तर आजाराशी जगणाऱ्या व्यक्ती आणि त्यांच्या कुटुंबीयांशी समाजाने कसे वागावे याची जाणीव निर्माण करणे होय.अल्झायमरचा प्रश्न आपल्याला वृद्धत्वाकडे पाहण्याच्या आपल्या सामाजिक दृष्टिकोनाचाही विचार करायला भाग पाडतो. वृद्ध व्यक्तीची स्मरणशक्ती कमी होत असली तरी तिच्या भावना नष्ट होत नाहीत. तिला प्रेम, आपुलकी, सन्मान आणि सुरक्षिततेची गरज असते. कदाचित ती काही नावे विसरेल, काही घटना विसरेल किंवा काही चेहरे ओळखण्यात अडचण येईल; परंतु तिच्याशी केलेले प्रेमळ वर्तन आणि आपुलकीची भावना तिच्या भावविश्वाला स्पर्श करू शकते. म्हणूनच स्मृती क्षीण होत असताना नात्यांची ऊब अधिक महत्त्वाची ठरते.आजच्या वेगवान जीवनात वृद्ध आई-वडिलांसाठी वेळ काढणे अनेकांना कठीण वाटते. मात्र त्यांच्या आयुष्याच्या उत्तरार्धात त्यांना आवश्यक असते ती नेहमी मोठ्या आर्थिक मदतीचीच असे नाही; अनेकदा त्यांना आपल्या माणसांचा सहवास, संवाद आणि आपलेपणाची खात्री हवी असते. दिवसातून काही मिनिटे मनापासून बोलणे, त्यांची विचारपूस करणे, त्यांच्या आठवणी ऐकणे आणि त्यांच्या भावनांना मान्यता देणे याचे मूल्य मोठे आहे. वृद्ध व्यक्तीला 'तुम्ही आमच्यासाठी महत्त्वाचे आहात' ही जाणीव करून देणे ही कोणत्याही औषधापेक्षा वेगळी पण अत्यंत आवश्यक मानवी चिकित्सा आहे.जागतिक अल्झायमर दिनाचा खरा अर्थ केवळ अल्झायमरविषयी माहिती वाढवण्यात नाही, तर वृद्ध व्यक्तींच्या जीवनाकडे अधिक संवेदनशील नजरेने पाहण्यात आहे. वृद्धत्व हे ओझे नाही, तर जीवनप्रवासाचा एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे. स्मरणशक्ती कमी होणे ही व्यक्तीची संपूर्ण ओळख नाही. अल्झायमर असलेली व्यक्ती म्हणजे केवळ 'रुग्ण' नव्हे; ती कोणाची आई आहे, कोणाचा वडील आहे, कोणाची आजी किंवा आजोबा आहे, कोणाची जीवनसाथी आहे आणि अनेक वर्षांच्या अनुभवांनी समृद्ध असलेली एक स्वतंत्र व्यक्ती आहे. तिच्या आजारापलीकडे तिचे व्यक्तिमत्त्व आणि मानवी प्रतिष्ठा पाहणे आवश्यक आहे.आज आपण वृद्ध व्यक्तींच्या आरोग्याची, मानसिक सुरक्षिततेची, आर्थिक संरक्षणाची आणि सामाजिक प्रतिष्ठेची जबाबदारी स्वीकारली तर अल्झायमरच्या प्रश्नाकडे अधिक व्यापक पद्धतीने पाहता येईल. कुटुंब, आरोग्यव्यवस्था, स्थानिक स्वराज्य संस्था, सामाजिक संस्था आणि समाज यांचा समन्वय वृद्धांसाठी आधारव्यवस्था निर्माण करू शकतो. अल्झायमरवर उपचार आणि संशोधन महत्त्वाचे आहेतच; परंतु त्यासोबत रुग्ण आणि काळजीवाहू यांच्या जीवनाची गुणवत्ता सुधारण्यावरही भर देणे गरजेचे आहे. कारण कोणत्याही आजाराच्या उपचाराचा अंतिम उद्देश केवळ आयुष्य वाढवणे नसून शक्य तितक्या सन्मानाने आणि अर्थपूर्ण पद्धतीने जीवन जगण्याची संधी देणे हा असतो.२१ सप्टेंबरचा जागतिक अल्झायमर दिन म्हणून आपण एक साधा पण महत्त्वाचा संकल्प करू शकतो की विस्मरणाकडे उपहासाने नव्हे, तर समजुतीने पाहूया; वृद्धत्वाकडे दयेने नव्हे, तर सन्मानाने पाहूया आणि वृद्ध व्यक्तींच्या आयुष्याच्या शेवटच्या टप्प्याला एकटेपणाची शिक्षा न बनवता आपुलकीची साथ देऊया. स्मरणशक्ती हरवू शकते, काही ओळखी धूसर होऊ शकतात, काही आठवणी काळाच्या पडद्याआड जाऊ शकतात; पण माणसाचा सन्मान हरवता कामा नये. अल्झायमरच्या सावलीतही वृद्ध व्यक्तीचे माणूसपण उजळत राहावे, हीच या दिवसाची खरी सामाजिक जाणीव ठरावी.



**डॉ. राजेंद्र बगाटे,**
(लेखक, समाजशास्त्र आणि वृद्धत्वशास्त्राचे अभ्यासक आहेत) ईमेल —
bagate.rajendra5@gmail.com

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २० सप्टेंबर २०२६

# प्रवास लाल केसांचा

अबोलप्रीती
एक अनवट प्रेमकथा...

**(भाग २ )**गण्डगी नदीच्याच किनारी सारसनगरच्या खाली ‘भाग्यनगर’ नावाचे एक छोटे गाव होते. भाग्यनगरमध्ये चांगले कुशल कारागीर होते. ते मातीची, विविध धातूंची भांडी बनवत, शेतीची औजारे बनवत. वेगवेगळ्या आकाराच्या बैलगाड्या तसेच रथ बनवत, कोणी अप्रतिम नक्षीचे दागिने बनवत. गावातील मुलांसाठी सैनिकी प्रशिक्षणाची शाळा होती, तसेच वेदपाठशाळाही होती. भाग्यनगरमधील प्रजा सूर्यसेनराज्याच्या चांगल्या राज्यकारभारामुळे सुखी होती. प्रत्येकजण आपापाले काम इमानेइतबारे करीत असे. याच भाग्यनगरमधील सैनिकी शाळेमध्ये शिकणारे समीरकुमार आणि चन्द्रवल्लभ हे दोन जिवलग मित्र होते. दोघांचीही घरे शेजारी-शेजारीच होती. तेही त्याचदिवशी म्हणजे शाकम्भरी पौर्णिमेच्या दिवशी गण्डगी नदीच्या किनारी पोहायला आले होते. पोहून झाल्यावर ते नदीकिनारी असलेल्या बोरीच्या झाडावर चढून उत्तम पिकलेली, पोपटाने खाल्लेली बोरे खात होती. एवढ्यात समीरकुमारला नदीपात्रात दूर लांबवर काहीतरी तरंगताना दिसले. त्याने चन्द्रवल्लभला ते दाखवत विचारले, “तुला ते लांबवर नदीत काहीतरी तरंगताना दिसते का ? काही लक्षात येत आहे का काय आहे ते ?” “काय ते... ? ते तरंगत आहे ते ? काही लक्षात येत नाही काय आहे ते ?” - चन्द्रवल्लभ.

“अरे बघतोस काय नुसता चल मार उडी आपण जावूनच बघू.” - समीरकुमार. असे म्हणत समीरने नदीत झाडावरूनच उडी मारली. पाठोपाठ चन्द्रवल्लभनेही उडी मारली. त्या दोघांमध्ये चढाओढच लागली, कोण आधी पोहोचतो. थोडे जवळ आल्यावर त्यांना दिसले तो तर साधा द्रोण आहे.

“तो द्रोण माझा...” चन्द्रवल्लभ.

“तो द्रोण तुझा पण त्या द्रोण्याच्या आतले माझे...” समीर. बघता बघता चन्द्रवल्लभ सपासप हात-पाय मारत द्रोणापर्यंत पोहोचलासुद्धा. चन्द्रवल्लभने द्रोण हातात घेतला, त्याच क्षणाला समीरही तेथे पोहोचला. त्याने झडप घालून तो द्रोण हिसकावून घेतला. बघतो तर काय... त्या द्रोणात लाल रंगाच्या लांब केसांचे गुंतवळे. हे ते गुंतळे पाहताच, चन्द्रवल्लभला खूपच हसू आले. तो म्हणाला, “घे... ते केस घे... तुला द्रोणाच्या आतले हवे होते ना... ?”

समीरला ते लाल केस बघताच आश्चर्य वाटले. हे केस लाल कसे काय ? आपले तर केस काळे आहेत. केवळ आपलेच नाही तर सगळ्या भाग्यनगरमधल्या लोकांचे केस काळे आहेत, कोणी म्हातारे असेल तर पांढरे केस असतात. पण लाल केस ? हे कोणाचे आहेत ? वरच्या अंगाला तर सारसनगर आहे... मग सारसनगरमध्ये असे लाल केस असणारे कोण आहे ? “अरे त्या केसांकडे काय बघतोस ? आपण एवढ्या लांबून पोहत आलो आणि हाती काय आले तर केस... !” - चन्द्रवल्लभ.

“चन्द्या, अरे मूर्खा... तुझे केस काळे आहेत की लाल ?” - समीरने चन्द्रवल्लभचे केस मूठीत पकडून जोरात ओढत विचारले. “काळे... काळे... सोड सोड... सम्या” चन्द्रवल्लभ.

“मग हे लाल केस कोणाचे ? माहित आहे ?” समीर. “अरे कोणाचे का असेना आपल्याला काय करायचे ?” - चन्द्रवल्लभ. “चल मी असाच उलटा पोहत चाललो सारसनगरला, बघतो लाल केसवाली कोण आहे ते ? तू येतोस का माझ्याबरोबर ?” - समीर. “तुला जायचे तर जा, मी नाही येत. मला खूप भूक लागली आहे. घरी जाऊन कधी एकदा खिमट खातो असे झाले आहे.” - चन्द्रवल्लभ. “मर तिकडे, तू जा निवासात, मी चाललो.” असे म्हणत समीरने आपल्या कनवटीत ते लाल केस व्यवस्थीत बान्धून पाण्यात सूर मारलासुद्धा. तो उलटा पोहोत पोहोत सारसनगरला आला. पाहतो तर शाकम्भरीदेवीच्या मन्दिरात खूप गर्दी होती. खूप महिला-पुरुष दर्शनाला येत होते. समीर बराच वेळ एका बाजूला थांबून प्रत्येक महिलेच्या डोक्याकडे पहात होता. त्याला एक पक्के माहित होते की हे केस कोणा महिलेचच आहेत. कारण ते केस खूपच लांब होते आणि नेहमीच वेणी घातल्यामुळे ते नागमोडी वळणाचे झाले होते. पण त्याला कोणतीच महिला लाल केस असलेली दिसली नाही. एव्हाना सुर्य मावळतीकडे झुकला होता. त्याला खूप भूकही लागली होती. अंधार पडायच्या आत भाग्यनगरला जायला हवे, मग नाईलाजाने तो नदीत उतरला तो मनाशी पक्का निश्चय करूनच की, “या लाल केसवाल्या महिलेला शोधायचेच.”

समीर पोहत पोहत पुन्हा भाग्यनगरला आला. घरी पोहचला तर चन्द्रवल्लभ ओसरीवर समीरची वाट पहातच बसला होता. तो दिसताच “या राजे... सापडली का ती लाल केसवाली कोण आहे ते ?” समीरने नकारार्थी मान डोलावली.“तरी मी तुला म्हणालोच होतो आपल्याला काय करायचे कोणाचे केस आहेत ते ? ते महिलेचेच असतील कशावरून ? घोड्याचेही असू शकतात...” समीर म्हणाला “नाही ते घोड्याचे नाहीत, घोड्याचे केस माणसच्या केसापेक्षा जास्त राठ असतात. हे केस अगदी मऊ आहेत, शिवाय नागमोडी वळणाचे आहेत. घोड्याच्या शेपटीचे असते तर सरळ असते...” “बरं. तुझं खरं... जाऊ दे... ते केस फेकून दे आता कशाला एवढे जपून, अगदी कनवटीला बांधून आणले पार अगदी निवासात.” - चन्द्रवल्लभ. “मी आता उद्यापासून शाळेत येणार नाही, मी आता जोपर्यंत ती लाल केसवाली महिला शोधून काढत नाही तोपर्यंत स्वस्थ बसणार नाही.” समीरने आपला निश्चय चन्द्रवल्लभला बोलून दाखविला. त्याने ते लाल केस एका रेशमी पिशवीमध्ये व्यवस्थीत जपून ठेवले.

संध्याकाळी समीरने चांगले पोटभर जेवण केले. बाहेरच्या ओसरीवर बाजल्यावर नेहमीसारखा झोपायला आला. पौर्णिमेचे टिपूर चांदणे पडले होते. बाजल्याच्या बाजूला त्याचा मोती कुत्राही झोपला. पडल्यापडल्या वर त्या पौर्णिमेच्या चंद्राकडे पहात तो झोपायचा प्रयत्न करू लागला, पण त्याला ‘आपल्या सगळ्यांचे केस काळे आहेत तर मग हे लाल केस कसे काय ? आणि कोणाचे ?’ या प्रश्नाने त्याला काही झोपच लागेना. त्याची झोपच उडाली. आता त्या लाल केसवाल्या महिलेला कसे शोधायचे ? याचा विचार तो करू लागला. मग त्याला एक युक्ती सुचली. ते केस तर महिलेचे आहेत. मग महिलांना भेटता येईल असे काही करायला हवे, म्हणून आपण महिलांचे उपयोगी असे कुंकू, आरसे, बांगड्या, गोफ, मणी, लाकडी कंगवे असे बरेच साहित्य सारसनगरमध्ये आणि आजूबाजूच्या नगरांमध्ये विकायला सुरवात करू. कारण तो द्रोण सारनगरहूनच आला असेल कशावरून, किंवा ती महिला सारसनगरला दुसऱ्या नगरातून आली असेल, देवीचे दर्शन घेऊन केस द्रोणात टाकून आपल्या नगरात निघूनही गेली असेल. शेवटी एक ना एक दिवस ती महिला आपल्याला दिसेलच. (क्रमशः)



**अनिकेत भालेराव.**
पत्ता : 12, वासुदेवानंद, 651, नारायण पेठ, पुणे 411 030.
विद्युत पत्र :
aniket.bhalerao@rocketmail.com
भ्रमणध्वनी : 9422504608

## याची देही याची डोळां , अनुभवला मी अमृताचा सोहळा, भोसले घराण्याचे वंशज गहिवरले



**दौलताबाद (जावेद अहमद) :** छत्रपती शरीफजी राजे भोसले यांचे वंशज विक्रम सिंह राजेभोसले यांनी प्रथमच वेरूळ नगरीला म्हणजेच आपल्या वतनाला भेट दिली .यावेळी त्यांना महाराष्ट्र पर्यटन संचालनालयाचे पर्यटन सहाय्यक तथा पर्यटन मार्गदर्शक डॉ.शिवाजी गायकवाड यांनी शहाजीराजे गडी, वेरूळ लेणी व घृष्णेश्वर मंदिर याबाबत पर्यटन मार्गदर्शन केले त्यांच्या समवेत त्यांचे कुटुंबीय सुद्धा यावेळी उपस्थित होते. भोसले गढी येथे आल्यानंतर सदर कुटुंबाने तेथील विकास कामांचा आढावा घेतला व तेथील माती आपल्या कपाळाला लावून धन्य झालो मी या ठिकाणी येऊन अशी प्रतिक्रिया दिली यावेळी त्यांना आपल्या कुटुंबीयांनी लढलेल्या लढाया व समाजात निर्माण केलेला एकोपा आणि भोसले घराण्याविषयी जनमानसामध्ये असलेली ओढ व निष्ठा याबाबत "राजे छत्रपती" म्हणताच येणारा अंगावरील शहरा याचा जवळून अनुभव घेतला आपल्या वंशज्यांना डोळ्यांनी बघता आले नाही तरी या भूमीत येऊन त्यांनी धन्य झालो पांडुरंगा आई जगदंबा असे उद्गार काढले यावेळी त्यांनी भोसले गडीसह वेरूळ लेण्यांना भेट दिली व घृष्णेश्वर मंदिराला भेट दिली मंदिराला भेट दिली असता त्यांनी भोसले घराण्यांची होळकर घराणे यांनी सदर मंदिराचा जिर्णोद्धार केला याचा शिरा लेखही त्यांनी वाचला आणि आम्ही आमच्या वंशाना या ठिकाणी भेटीसाठी पुन्हा पुन्हा व हा जागतिक वारसा पर्यटनाच्या माध्यमातून आणि वंशजाने माध्यमातून जगाला दाखवू असे सांगितले हाय जयदीप देदीप्यमान इतिहास व या ठिकाणी आलेले अनुभव आणि आल्यानंतर ची प्रचिती यामध्ये अतिशय साम्य असून येथील इतिहास हा जगाला दिसला पाहिजे समजला पाहिजे जाणून घेतला पाहिजे अशी त्यांनी भावना व्यक्त केली. यावेळी माळीवाडा गावचे माजी सरपंच बबाजी मुळे, सुधाकर हेकडे,किशोर पाटील,डॉ . शिवाजी गायकवाड,भारत भास्कर, बाबासाहेब नरोडे, संतोष जाधव, संदिप बनकर , रामा सुरासे ,वास्तुविशारद उल्हास मराठे यांनी शॉल हार देवुन स्वागत-सत्कार केला.